# लोकप्रशासनाच्या नवीन अभ्यासक्रमावर देगलूर महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

देगलूर– लोकप्रशासनाच्या नवीन अभ्यासक्रमांवर अभ्यास मंडळ व पदव्युत्तर शिक्षक यांच्यात विचारमंथन करण्यासाठी येथील देगलूर महाविद्यालयात दि. २७ सप्टेंबर रोजी एक दिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व पदव्यूतर वर्गासाठी नवीन अभ्यासक्रम लागू केला आहे. या नवीन अभ्यासक्रम ावर लोकप्रशासन अभ्यास मंडळ व पदव्युत्तर शिक्षक यांच्यात विचारमंथन होणे आवश्यक आहे. त्यासाठी दि. २७ सप्टेंबर रोजी एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. या कार्यशाळेत नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील लोकप्रशासन विषयाचे पदव्युतर प्राध्यापक व बोर्ड ऑफ स्टडीचे अध्यक्षांसह सदस्य सहभागी होणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पा.बेम्बरेकर हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार प्राचार्य डॉ मोहन ख़ताळ, विद्यापीठातील लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. शेख एम.आय., विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संतराम मुंडे व ने. सू. बोस महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. अनंत कौसडीकर उपस्थित राहणार आहेत.

प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या अध्यक्षतेखाली व बापूसाहेब पाटील एकम्बेकर महाविद्यालय, हनेगाचे प्राचार्य डॉ. पंचशील एकम्बेकर, शिवाजी महाविद्यालय कन्नडचे प्रा.डॉ.संजय भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप होईल.

या कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून डॉ.मुक्ता सोमवंशी, डॉ. बाळासाहेब भिंगोले, डॉ. शंकर लेखने, डॉ. अमोल काळे, डॉ. चांदोबा कहाळेकर, डॉ. बी. आर. कतुरवार, डॉ.संजय देबडे, डॉ. रामेश्वर खंदारे, डॉ. विजय तरोडे हे सहभागी होणार आहेत, अशी माहिती उपप्राचार्य डॉ. ए. बी. चिद्रावार, समन्वयक डॉ. बी. आर. कतुरवार, सहसमन्वयक डॉ. एस. एम. देबडे यांनी दिली आहे.

Scanned with OKEN Scanner